रक्षाबंधन
निमित्त
शुभेच्छा!



दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

वर्ष : ०६ | अंक : १४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.२८ ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## नेपाळला पुराचा विळखा, तरीही सिलिंडरसाठी आटापिटा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, काठमांडू :** नेपाळमध्ये आलेल्या भीषण पुरात मृत्यूमुखी पडलेल्यांचा आकडा ३५९ वर पोहोचला आहे. अद्यापही ८०० ते ९०० जण बेपत्ता आहेत. हा आकडा पाहता मृतांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. नेपाळमधील बरेसचे भाग पाण्याखाली गेलेले असताना सिलिंडरसाठी लोक जीव धोक्यात घालत आहेत. पूर परिस्थितीत सिलिंडरसाठी आयुष्य पणाला लावणाऱ्या नेपाळी नागरिकांचे व्हिडीओ सोशल मीडियावर पाहायला मिळत आहेत.

पूर परिस्थितीत सिलिंडरसाठी नेपाळी जनतेची धावाधाव सुरू आहे. सिलिंडरसाठी अनेकांचा आटापिटा चालला आहे. एक जण दोन खांद्यांवर दोन सिलिंडर नेताना दिसत आहे. तर दुसरीकडे पुराच्या पाण्यात बाकी सगळ्या वस्तूंकडे दुर्लक्ष करून सिलिंडरसाठी



जीव धोक्यात घातला जात आहे. नेपाळी जनतेच्या वर्तनावर अनेकांनी सोशल मीडियावर टीका केली आहे. पण नेपाळमधलं वास्तव वेगळं आहे.

**सिलिंडरसाठी इतका आटापिटा कशाला?**

नेपाळमध्ये असलेल्या एलपीजी संकटामुळे सिलिंडरसाठी लोकांचा आटापिटा सुरू असल्याचं दिसतं. नेपाळ बऱ्याच महिन्यांपासून एलपीजी तुटवड्याचा सामना करत आहे. मार्च-एप्रिल २०२६ पासूनच देशात एलपीजी संकट आहे. यातून मार्ग काढण्यासाठी सरकारनं वेगवेगळे उपाय केले. पण तरीही परिस्थितीत फारशी सुधारणा झालेली नाही. सिलिंडरमध्ये केवळ ७.१ किलो गॅस भरून देण्याचा पर्यायही वापरून पाहण्यात आला आहे.

नेपाळ विद्यार्थी संघाचे नेते रिकामी सिलिंडर घेऊन आंदोलन करत असल्याची बातमी काठमांडू पोस्टनं १६ ऑगस्टलाच दिली होती. एलपीजीच्या तुटवड्यामुळे काठमांडूसह देशाच्या बऱ्याच भागांमध्ये भीषण स्थिती असल्याचा दावा त्यांनी केला होता. ग्राहकांना एलपीजी सिलिंडर मिळताना अडचणी येत असून त्यांना तासनतास रांगा लावाव्या लागत होत्या. त्यामुळे लोकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत होता.

राजधानी काठमांडूमध्ये एलपीजी सिलिंडरसाठी रांगा लागत असल्याचं वृत्त १५ ऑगस्टला रॉयटर्सनं दिलं होतं. प्रशासनाकडून काठमांडूमध्ये पाच ठिकाणी सिलिंडरची विक्री केली जात होती. अशा स्थितीत अत्यावश्यकता असलेले ग्राहक त्यांचा नागरिकत्वाचा किंवा राष्ट्रीय ओळखपत्र दाखवून एलपीजी सिलिंडर खरेदी करत होते.

## धारदार शस्त्राने हल्ला, दहशत अन् वारंवार गुन्हे; चौघांवर मोक्का

**अक्षराज : प्रणिल कुसळे**

**दि.२७, पुणे :** विश्रांतवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत दहशत निर्माण करून वारंवार गुन्हे करणाऱ्या सराईत टोळीविरुद्ध पोलिसांनी मोक्का कायद्यान्वये कारवाई केली आहे. मुख्य टोळीप्रमुख शोएब रशीद कुरेशी (वय २६, रा. चंद्रमानगर, येरवडा), राज मुकेश सरवदे (वय २१, रा. भीमनगर, विश्रांतवाडी), हुसेन अस्लम खान (वय २१, रा. चंद्रमानगर, येरवडा) तसेच एका विधी संघर्षग्रस्त बालकाचा यात समावेश आहे.




१४ जून २०२६ रोजी रात्री पंचशीलनगर, येरवडा येथील दयावान समाज मंदिरासमोर उमेश मंगलदास गायकवाड व त्यांच्या मित्रावर आरोपींनी धारदार शस्त्राने हल्ला केला होता. या हल्ल्यात गायकवाड गंभीर जखमी झाले होते. तसेच परिसरात दहशत निर्माण केल्याप्रकरणी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान शोएब कुरेशी हा गुन्हेगारी टोळीचा प्रमुख असून, साथीदारांसह वारंवार गुन्हे करत असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले. त्यामुळे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी मोक्का कारवाईचा प्रस्ताव वरिष्ठांकडे सादर केला.

२६ ऑगस्ट २०२६ रोजी अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर यांनी प्रस्तावास मंजुरी दिल्यानंतर आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) १९९९ मधील कलम ३(१)(ळळ), ३(२) व ३(४) अन्वये कारवाई करण्यात आली.

ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपआयुक्त रजनीकांत चिलुमुला आणि सहायक पोलीस आयुक्त सुनील जैतापुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

विश्रांतवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, तपास पथक प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक सुनील उगले, तसेच सर्व्हेलन्स पथकातील सहायक पोलीस फौजदार मनोज शिंदे, पोलीस शिपाई सुनील हसबे, महिला पोलीस शिपाई विद्या पानसरे यांनी तपासात महत्त्वाची भूमिका बजावली.

तपास पथकातील पोलीस हवालदार बबन वणवे, यशवंत किर्वे, कृष्णा माचरे, स्वप्नील कांबळे, विशाल गाडे, संपत भोसले, धवल लोणकर, वामन सावंत, संजय बादरे, तसेच पोलीस शिपाई किशोर भुसारे, प्रमोद जाधव आणि होनाजी साबळे यांनीही कारवाईत सहभाग घेतला. आरोपींवर मोक्का लावल्याने विश्रांतवाडी परिसरातील गुन्हेगारी टोळ्यांना पोलिसांनी कडक इशारा दिला आहे..

## वारकरी ते व्यापारी सर्वांच्या सूचनांनंतरच पंढरपूरचा विकास आराखडा अंतिम : फडणवीस

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२७, पंढरपूर :** पंढरपूरच्या विकास आराखड्यात वारकरी, भाविक, स्थानिक नागरिक, व्यापारी, मठाधिपती तसेच लोकप्रतिनिधींच्या सूचना व मागण्यांचा समावेश करून सर्वांना विश्वासात घेतल्यानंतरच आराखडा अंतिम करण्यात येईल. पंढरपूरचा विकास हा केवळ आजच्या गरजा लक्षात घेऊन नव्हे, तर पुढील ५० वर्षांचा विचार करून करण्यात येत असून, भाविकांच्या सोयी-सुविधांसोबतच स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्यावर भर राहणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.



सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, मंदिर समितीचे पदाधिकारी तसेच पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

**वाढत्या भाविक संख्येसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर...**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पंढरपूरला दरवर्षी येणाऱ्या भाविकांची संख्या सातत्याने वाढत आहे. त्यामुळे भविष्यातील गर्दीचे नियोजन पारंपरिक पद्धतींसोबतच आधुनिक तंत्रज्ञान आणि विविध डिजिटल टूल्सच्या माध्यमातून शास्त्रशुद्ध पद्धतीने करणे आवश्यक आहे. भाविकांना सुरक्षित, सुलभ आणि सुरळीत दर्शन तसेच प्रवासाची सुविधा मिळावी, यासाठी संपूर्ण शहराचे एकात्मिक नियोजन केले जाईल. हा विकास आराखडा शासनाकडून एकतर्फी लादला जाणार नाही. पंढरपूरचे नागरिक, आर्किटेक्ट्स, लोकप्रतिनिधी आणि इतर संबंधित घटकांनी मांडलेल्या सूचनांचा गांभीर्याने विचार करून त्यातील शक्य त्या चांगल्या बाबी आराखड्यात समाविष्ट कराव्यात, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

**मंदिरे-मठांचे धार्मिक व ऐतिहासिक अस्तित्व अबाधित...**

पंढरपूरमधील जुनी मंदिरे आणि मठांचे धार्मिक तसेच ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन त्यांना आहे त्याच ठिकाणी ठेवून विकास केला जाईल. कोणतेही मंदिर किंवा मठ स्थलांतरित केले जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका मुख्यमंत्री फडणवीस यांनी मांडली. विकास आराखड्यामुळे बाधित होणाऱ्या दुकानदार, रहिवासी आणि व्यावसायिकांच्या पुनर्वसनाला शासनाचे सर्वोच्च प्राधान्य राहणार आहे. बाधितांना 'जागेस जागा' देण्याच्या धोरणानुसार योग्य पर्याय उपलब्ध करून देण्यात येतील. बाधित दुकानदारांना पर्यायी दुकाने देण्यासोबतच ५०० हून अधिक बाधित घरांतील नागरिकांच्या पुनर्वसनाचेही नियोजन करण्यात आले आहे.

पंढरपूरमधील जमीन व मालमत्ता अधिग्रहणासाठी देण्यात येणारा मोबदला मुंबईतील दरांच्या धर्तीवर देण्यात आला असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**तीर्थक्षेत्र विकासातून स्थानिक अर्थव्यवस्थेला बळ**

धार्मिक स्थळांचा नियोजनबद्ध विकास झाल्यास भाविकांची संख्या वाढते आणि त्याचा सकारात्मक परिणाम स्थानिक अर्थव्यवस्थेवर होतो. त्यामुळे पंढरपूरच्या विकासाकडे केवळ रस्ते, वाहतूक आणि पायाभूत सुविधांच्या दृष्टीने न पाहता भविष्यातील आर्थिक विकासाच्या दृष्टिकोनातूनही पाहणे गरजेचे आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

पुढील अनेक दशकांचा विचार करून पंढरपूर अधिक सक्षम, सुरक्षित आणि भाविकांसाठी सुलभ करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. विकास आराखड्यात काही उणिवा किंवा त्रुटी राहिल्यास संबंधितांनी सूचना कराव्यात. सर्व घटकांनी परस्पर समन्वयातून काम करून पंढरपूरच्या विकासासाठी सर्वोत्तम मार्ग काढावा, असे आवाहनही त्यांनी केले.

**तीर्थक्षेत्र बचाव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मांडली मते...**

बैठकीत पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीचे अभयराजे इंचगांवकर कुलकर्णी, व्यंकटेश नारायण कुलकर्णी, वीर राम कृष्ण महाराज, मुकुंद बडवे, बैभव बडवे, गणेश लंके, डॉ.प्राजक्ता बेणारे, चैतन्य बारसोडे, दर्शन महाजन बडवे, मनोजकुमार रामकिसन राठी आणि संजय आवताडे यांनी आपल्या सूचना व मते मांडली.

बैठकीला जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नागपूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूरचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, पंढरपूरचे उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, पंढरपूर मंदिर समितीचे उपजिल्हाधिकारी तथा व्यवस्थापक राजेंद्र शेळके, सोलापूरचे उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, विधी अधिकारी राजेश अंदाने, पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## चंद्रपुरात बनावट विद्यापीठ पदव्याचा पर्दापाश !

### ५ नामांकित विद्यापीठाच्या बोगस पदव्या विकल्या, एका युवकास अटक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चंद्रपूर :** शहरातील दुर्गापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बनावट शैक्षणिक प्रमाणपत्रे आणि पदव्यांची विक्री करणाऱ्या एका मोठ्या रॅकेटचा पर्दापाश झाला असून, या घटनेने शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रात प्रचंड खळबळ उडाली आहे.




नोकरी, महाविद्यालयातील प्रवेश तसेच पदोन्नती मिळवून देण्याच्या नावाखाली ५ ते १० लाख रुपये उखळून विविध नामांकित विद्यापिठांच्या बोगस पदव्या व मार्कशीट विकल्या जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी तक्रारीवरुन दुर्गापूर पोलिसांनी तुकुम परिसरातील रहिवासी आरोपी परिमल बाबुराव गौरकर (वय ३२) यांच्याविरुध्द फसवणूक आणि बनावट कागदपत्रे तयार केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांखाली गंभीर गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तुकुम येथील चिंतामणी अपार्टमेंटमध्ये राहणारे वैभव गणपतराव मासिरकर यांना आरोपी परिमल गौरकर याने जानेवारी २०२६ मध्ये फोन करुन कारमधील एक कापडी थैली काढून घरात सुरक्षित ठेवण्यास सांगितले होते. शेजारी असल्याने मासिरकर यांनी ती थैली आपल्या घरात ठेवली. मात्र, त्यानंतर काही दिवसांनी आरोपी त्या थैलीतील काही प्रमाणपत्रे नेण्यासाठी आला असता मासिरकर यांनी याबाबत विचारणा केली. त्यावेळी आरोपी गौरकर यांने नोकरी, ॲडमिशन किंवा प्रमोशनसाठी गरज असलेल्या उमेदवारांकडून ५ ते १० लाख रुपये घेऊन बनावट पदवी, डिप्लोमा, टीसी व मार्कशीट तयार करुन देत असल्याची उघड कबुली दिली.

संशय आल्याने मासिरकर यांनी त्या थैलीची पाहणी केली असता, त्यात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, सोलापूर विद्यापीठ, श्रीधर युनिव्हर्सिटी (पिलानी, राजस्थान), गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली आणि छत्रपती शाहुजी महाराज युनिव्हर्सिटी (कानपूर) या नामांकित ५ विद्यापिठांच्या सेमिस्टरच्या बनावट मार्कशीट्स, डिप्लोमा प्रमाणपत्रे व मायग्रेशन सर्टिफिकेट्स मोठ्या प्रमाणावर आढळून आले. या सर्व प्रमाणपत्रांवर विद्यापिठांचे बनावट शिक्के आणि खोट्या स्वाक्षऱ्या करण्यात आल्याचे उघड झाले. आरोपी ही थैली परत नेण्यास टाळाटाळ करत असल्याने अखेर मासिरकर यांनी दुर्गापूर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली. या तक्रारीवरुन दुर्गापूर पोलिसांनी आरोपी परिमल बाबुराव गौरकर यांच्याविरुध्द भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३१८(४), ३३६(३) आणि ३४०(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक संतोष शेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक रवींद्र नक्कनवार या बोगस प्रमाणपत्र रॅकेटचा पुढील सखोल तपास करत आहेत.

नामांकित ५ विद्यापिठाच्या बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे अनेकांनी खाजगी तसेच शासकीय नोकऱ्या मिळवून शासन आणि कंपन्यांची मोठी दिशाभूल केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

## रणरागिणी यांचे न्याय हक्कासाठी महाराष्ट्रभर कामबंद...

**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.२७, चिमूर :** उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत ग्रामीण भागात महिला बचतगटांच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविणाऱ्या ग्रामसखी यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर कामबंद आंदोलनाचा निर्णय घेतला आहे.

ग्रामसखी या ग्रामीण महिलांना बचतगटांची निर्मिती, आर्थिक व्यवहार, शासकीय योजनांची माहिती, तसेच महिला सक्षमीकरणाच्या विविध उपक्रमांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

मात्र त्यांच्या कामाच्या तुलनेत अत्यल्प मानधन असून ग्रामसखी यांना १५००० व प्रभाग स्तरावरील कॅडर यांना २४००० रुपये मानधन देण्यात द्यावे, १० लाखाचा विमा संरक्षण देण्यात यावे, ऑनलाईन कामाचे स्वरूप पाहता ग्रामसखीना टॅब देण्यात यावे, ग्रामसखी यांना प्रसूती रजा मंजूर करावी, IJP प्रक्रिया राबविण्यात यावी, नवीन HR मॅन्युअल लागू करावे, १०% वार्षिक वेतनवाढ देण्यात यावी, प्रभाग समन्वयक व सहाय्यक कर्मचारी यांची विनंती बदली, प्रवास भत्ता व इतर प्रलंबित मागण्या आणि सेवा-सुविधांबाबत योग्य तो निर्णय घ्यावा. पुढील एक महिन्यात सर्व मागण्या पूर्ण कराव्यात अशी मागणी करण्यात आली.

ग्रामसखींच्या मागण्यांवर शासन, प्रशासन व लोकप्रतिनिधीने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. मागण्यांची पूर्तता होईपर्यंत कामबंद आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार ग्रामसखींकडून व्यक्त करण्यात आला आहे.

ग्रामीण महिलांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या ग्रामसखींच्या मागण्यांची शासनाने व लोकप्रतिनिधीनी गांभीर्याने दखल घेऊन तातडीने तोडगा काढावा, अशी अपेक्षा संपूर्ण महाराष्ट्रातील ग्रामसखीनी व्यक्त केली आहे.

अक्षराज






## राखी पौर्णिमा



आज श्रावण पौर्णिमा आजचा दिवस संपूर्ण देशात राखी पौर्णिमा म्हणून साजरा केला जातो. राखी पौर्णिमा हा हिंदू संस्कृतीतील एक महत्वाचा सण मानला जातो. बहीण भावाच्या पवित्र नात्याला बंधनात बांधणारा हा सण. या दिवशी बहीण आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून त्याच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करते. भाऊ देखील आपल्या लाडक्या बहिणीला तिच्या आवडीची भेट देऊन तिला तिच्या सुरक्षेची हमी देतो त्यामुळे या सणाची बहीण भाऊ दोघेही आतुरतेने वाट पाहत असतात. विशेषतः जे बहीण भाऊ एकमेकांपासून लांब असतात त्यांना या निमित्ताने एकमेकांची भेट घेता येते. आपली सुख दुःख एकमेकांना सांगता येतात आणि जुन्या बालपणीच्या आठवणींना उजाळा मिळतो. राखी पौर्णिमा या सणाला पौराणिक इतिहास आहे. पुरातन काळात जेंव्हा स्त्री स्वतःला असुरक्षित मानत होती तेंव्हा ती अशा व्यक्तीस राखी बांधून भाऊ मानत असे जो तिची रक्षा करील. इंद्राच्या राणीने आपल्या मनगटावर एक धागा बांधला होता. ज्याच्या समर्थ्याने वज्रासुर राक्षसाचा पराभव केला तेव्हापासून त्याची स्मृती म्हणून मनगटावर राखी बांधण्याची पद्धत सुरू झाली असे मानले जाते. तसेच ऐतिहासिक काळात चित्तोडच्या राणी कर्मवतीने हुमायून बादशहाला राखी पाठवली व हुमायून बादशहाने देखिल आपल्या या बहिणीचे परकीय आक्रमणापासून संरक्षण केले. राखी पौर्णिमेचे असे अनेक दाखले पुराणात आणि इतिहासात पाहायला मिळतात. राखी पौर्णिमेला रक्षा बंधन असेही म्हणतात. राखी बांधण्याचा अर्थ आपण त्या व्यक्तीच्या बंधनात स्वतःला वाहून घेऊन तिच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारतो. राखी पौर्णिमेच्या दिवशी राखीचा धागा बांधून भाऊ बहिणीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारतो म्हणूनच या सणाला रक्षा बंधन असेही म्हणतात. रक्षा करणे जबाबदारी स्वीकारणे. या दिवशी भाऊ आपल्या बहिणीची जबाबदारी स्विकारतो. वडीलांच्या पश्चात भाऊ आपल्या बहिणीची सर्व परिस्थितीत जबाबदारी स्वीकारतो तर आईच्या पश्चात भावास आईचे निरपेक्ष प्रेम देणे, काळजी घेणे याची जबाबदारी बहीण स्वीकारते म्हणून याला रक्षा बंधन असे म्हणतात. या दिवशी बहीण आणि भाऊ एका पवित्र बंधनात बांधले जातात म्हणून या सणाला बहीण भावाच्या पवित्र नात्याच्या सण असे म्हटले जाते. राखी बंधनाच्या या पवित्र सणातून मित्रत्व, स्नेह व परस्पर प्रेम वृद्धिंगत होते. आपल्या संस्कृतीत स्त्रीला देवी मानले जाते. अशी ही देवतुल्य स्त्री म्हणजे बहीण आपल्या भावाला राखी बांधण्यापूर्वी त्याच्या कपाळावर टिळा लावते. हा टिळा फक्त मस्तकाच्या आदरचा नसून भावाच्या मस्तकातील सदविचार व सदबुद्धि जागृत राहण्यासाठीची ही पूजा असते. राखीचा धागा हा नुसताच सुताचा धागा नसून ते शील, स्नेह, पवित्रतेचे रक्षण करणारे, सतत संयमी ठेवणारे पुरुषार्थाचे बंधन आहे. ह्या एव्हढ्याशा धाग्याने कित्येक मने जुळून येतात. त्यांना भावनांचा ओलावा मिळतो व मन प्रफुल्लित होतो. एकमेकांना जोडणारा हा सण सामाजिक ऐक्याची भावना जागृत ठेवणारा आहे. रक्ताच्या नात्याव्यतिरिक्त आपल्या मनाप्रमाणे नाती जोडण्यास ह्या सणामुळे समाजास वाव मिळतो. ज्याला सखखी बहीण नाही किंवा जिला सख्खा भाऊ नाही ती बहीण मानस भावाला राखी बांधते आणि बहीण भावाचे पवित्र नाते वृद्धिंगत करते असा हा बहीण भावाच्या पवित्र नात्याचा सणाच्या सर्व भारतीयांना शुभेच्छा!

**– श्याम ठाणेदार**

# रक्षाबंधन...स्नेह आणि दृढ विश्वासाचे रेशमी बंधन

आपली भारतीय संस्कृती खूपच उदात्त, सुंदर, महान आहे. म्हणूनच परदेशातील लोकानासुद्धा याची भुरळ पडते ना!

कारण यात फक्त देव,धर्म,कर्मकांड यांच्या सणवार आणि रूढी,परंपरा,उत्सव यांनाच महत्व दिलेले नाही तर यात भावना आणि श्रद्धेचा विचार करून सामाजिक, धार्मिक, नैतिक मूल्यांनाही तेवढेच महत्वाचे स्थान दिले आहे आणि त्यानुसार सर्व उत्सव, सणवार साजरे केले जातात. यात पती-पत्नी, आई-मुलगा, भाऊ-बहिण अशा नात्यांना खूप महत्व आहे.

राखी पौर्णिमा ' म्हणजेच 'रक्षाबंधन' हा सुद्धा असाच एक भावा-बहिणीच्या पवित्र नात्याचा सुंदर भावनिक उत्सवच आहे. याला दुहेरी महत्वसुद्धा आहे बरका! आपला बराच भाग सागरांच्याकिनाऱ्यांवर देखील वसलेला आहे. त्यामुळे याच दिवशी तेथील कोळीबांधव हा सण 'नारळीपौर्णिमा' म्हणुन देखील साजरा करतात. यादिवशी ज्या सागराने आपल्याला अन्न,जीवन दिले त्याची जाणीव ठेवून त्याचे ऋण फेडण्यासाठी म्हणून त्याला नारळ,दिवे अर्पण करून नारळाचे गोडाचे पदार्थ बनवून खाऊन, नृत्य करुन गाणी गाऊन आनंदाने हा सण साजरा करतात. म्हणजेच मानव,देव यांच्या इतकेच निसर्गालाही या संस्कृतीत स्थान दिले आहे आणि ही खूपच सुंदर,अभिमानस्पद विशेष गोष्ट आहे.म्हणूनच आपली संस्कृती खूप

वेगळी,सुंदर आणि महान आहे.

निसर्गाशी आपले नाते जपण्याच्या सोबतच या दिवसाला भावा बहिणीच्या एकमेकांवरील प्रेमाला विश्वासाचे कोंदण देण्याचा हा अलौकिक सण! भाऊ व बहिणीचे नाते रेशमी धाग्यासारखे नाजूक असते. रक्षाबंधन या सणाला बहिण भावाच्या हातावर राखी बांधते व भाऊ तिला प्रेमाची भेटवस्तू देतो. एवढेच नाही तर तिच्या संरक्षणासाठी खंबीर आहे याची ग्वाहीही देतो.ही राखी म्हणजे केवळ एक रेशमी धागा नसतो,तर बहीण तिचे सुरक्षकवच भावाला बांधत असते. कोणतेही संकट यापुढे टीकाव धरू शकत नाही असे या धाग्याचे खास महत्व आहे. हा तंतु ,राखी बांधून बहीण त्याला औक्षण करते, त्याचे सर्व मंगल व्हावे,दीर्घायुष्य लाभावे यासाठी प्रार्थना करते, गोड बनवून खायला घालते तर भाऊसुद्धा तिच्यावर येणाऱ्या कोणत्याही कठीण प्रसंगात, संकटात आयुष्यभर तिच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचे मनोमन आश्वासन देतो.

हा सण अगदी पुराण काळापासून सुरु असल्याचे कित्येक दाखले आहेत.' चिंधी बांधते द्रौपदी हरिच्या बोटाला ' ही महाभारतातील कथा श्रीकृष्ण व द्रौपदीच्या भाऊ बहिणीच्याएकम



`कांवरील असलेल्या प्रेम,विश्वास,श्रद्धा, आदर,त्याग यांचे दर्शन घडवते. प्रेमाने बांधलेल्या एका चिंधीसाठी हरी तिच्यावरील कित्येक अत्यंत कठीण प्रसंगात धावून येतो, रक्षण करतो. वस्त्रहरणाच्या कठीण प्रसंगात अगदी भीष्माचार्य, कुलगुरू, धृतराष्ट्रासारखा राजा सुद्धा काहीही करु शकला नाही तेंव्हा बहिणीच्या एका हाकेला तिने बांधलेल्या एका धाग्याची आठवण ठेवून तिचा भाऊ श्रीकृष्ण फक्त आलाच नाही,तर एका धाग्याच्या बदल्यात कित्येक उंची वसने देऊन तिचेलज्जारक्षण केले. हे पाहून या धाग्यात किती ताकद असते याची प्रचिती येते.सख्खी बहिण सुभद्रा इतकी माया, प्रेम केवळ या धाग्यामुळेच द्रौपदीसारख्या एका मानलेल्या बहिणीला सुद्धा मिळते.पुरातन काळात, जेव्हा स्त्री स्वतःस असुरक्षीत वाटायचे तेव्हा ती अशा व्यक्तीस राखी बांधून भाऊ मानत असे, जो तिची रक्षा करील.

दानवांचा राजा वृत्रासूर याने देवांचा राजा इंद्र याला युद्धाचे आव्हान दिले. इंद्र आपले वज्र घेऊन युद्धास निघाला. त्या वेळी इंद्राला विजय मिळावा म्हणून त्याची पत्नी शुची हिने विष्णूकडून मिळालेला एक दोरा (राखी) इंद्राच्या हातावर बांधला. त्या राखीच्या प्रभावाने इंद्राला त्या युद्धात विजय मिळाला व त्याचे गेलेले वैभव प्राप्त झाले. त्या दिवशी श्रावण पौर्णिमा होती. तेव्हापासून रक्षाबंधनाचा सण सुरू झाला असे म्हणतात. ऐतिहासिक काळात चित्तोडच्या राणी कर्मवतीने हुमाँयू बादशहाला राखी पाठवली व हुमाँयू बादशहाने पण आपल्याबहिणीचे परकीय आक्रमणापासून संरक्षण केले.समाजात ऐक्य आणि प्रेमभाव वाढीस लागावा यासाठी रक्षाबंधनाचा सण रजपूत लोकांत रूढ झाला.राजपूत स्त्रिया आपल्या शत्रूंच्या हातात राखी बांधून पुढे होणारा भयंकर संहार टाळीत असत व एकप्रकारे राखीचा उपयोग अहिंसेसाठी करीत असत. सण भारताच्या अनेक प्रांतांत साजरा केला जातो. हा राजस्थानचा प्रमुख सण आहे या पौर्णिमेला 'पोवती पौर्णिमा' असेही म्हणतात.राखीचा धागा हा देखील नुसताच सुताचा दोरा नसून ते एक शील, स्नेह, पवित्रतेचे रक्षण करणारे, सतत संयमी ठेवणारे पुर्षार्थाचे पवित्र बंधन आहे. ह्या एवढयाशा धाग्याने कित्येक मने जुळून येतात. त्यांना भावनांचा ओलावा मिळतो वं मन प्रफुल्लीत होते.

स्त्री कितीही मोठी, मिळवती झाली तरी तिच्या रक्षणाची जबाबदारी तिच्या भावावरच आहे हेच ती यातून त्याला सुचवू इच्छिते. यात तिचा दुबळेपणा नसून भावाच्या कर्तृत्वावरचा विश्वास दिसून येतो.रक्ताचे नाते असणारे भाऊ बहिण असोत किंवा मानेलेले असो, पण या नात्यामागची भावना पवित्र व खरी आहे. यात कुठेही फसवणूक नाही. त्यामुळेच तर भाऊ नसणारी स्त्री चंद्राला आपला भाऊ मानते व त्याला ओवाळते. आई आपल्या मुलाला 'चंदामामा' म्हणूनच चांदोबाची ओळख करून देते. म्हणून तरी कित्येक सामाजिक कार्यकर्ते अनाथाश्रम, दिव्यांग भगिनींकडुन खास राख्या बांधून घेतात. त्यांना आधार देतात. प्रेमने भेटवस्तू देतात. आपल्या मुख्यमंत्री साहेबांनी म्हणूनच तर 'लाडकी बहीण' योजना सुरु केली. त्यांना आयुष्यभर फुल ना फुलाची पाकळी मिळावी यासाठी चोळी बांगडीसाठी आर्थिक मदत सुरु केली. त्यामुळे त्यांना खूप मोठा दिलासा, आधार मिळाला. कित्येकजणी त्यामुळे आता स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभ्या राहिल्या आहेत. हा उत्सव लहानांपासुन ते वृद्धांपर्यंत सर्वजण आनंदात साजरा करतात. छोट्याश्या बहिणीपासून ते सासरी गेलेल्या बहिणींपर्यंत,अगदी मानलेल्या बहिणीसुद्धा या दिवशीआवर्जून भावाला भेटतात. जुन्या, लहानपणी घडलेल्या दोघांमध्ये घडलेल्या गमतीच्या, प्रेमाने दोघांनी एकमेकांची घेतलेली काळजी, प्रेम,कधी लटकी केलेलीभांडणे, रुसणे, मनवणे सारे काही अशा प्रसंगी आठवून मजा येते. भेटण्यामुळे प्रेम वाढते. प्रेमाने भावाने दिलेली भेट बहिणी जीवापाड जपतात.अभिमानाने मिरवतात. आईचे प्रतिबिंब म्हणजे तिची मुलगी असे मानले जाते. म्हणूनच आई आणिमुलाच्या नात्याइतकेच सुंदर आणि पवित्र,जवळचे नाते भाऊ..बहिणीचे! शाळेत,कॉलेजमध्ये हा भाऊ एखाद्या बॉडीगार्ड सारखा स्ट्राँग वाटतो,तर बहिणीची पाठवणी करताना तितकाच हळवा असतो. हे नाते काही विलक्षणच असते. या नात्यातील गंमत, ओढ, प्रेम,आदर, त्याग, काळजी या सर्व सुंदर गोष्टींचा संगम इतर कुठल्याच नात्यात नाही. सामाजिक ऐक्याची भावना जागृत ठेवण्यासाठी अशा प्रकारचे सण खूप महत्वाचे ठरतात.रक्ताच्या नात्याव्यतिरिक्त आपल्या मनाप्रमाणे सुंदर, प्रेमाची नाती जोडण्यास ह्या सणामुळे आपल्याला संधी मिळते. ज्या समाजात अशा प्रकारची एकरूपता, ऐक्य, आदर, प्रेम,असते असा समाज सामर्थ्यशाली बनतो हाच या राखी पौर्णिमेचा संदेश आहे.

पूर्वी फोन,इंटरनेट , कुरिअर या सुविधा नव्हत्या तेंव्हा दूर ,परगावच्या बहिणीना राखीपौर्णिमेला भावाला येऊन राखी बांधणे शक्य नसेल तेंव्हा पोस्टाने या राख्या पाठवायच्या. भाऊ देखील या पोस्टमनची अगदी आतुरतेने वाट पाहायचा. पोस्टमन म्हणजे अगदी देवदूतच होता. आणि पोस्टमनदादा सुद्धा कितीही ताण असला तरीभावाबहिणीच्या प्रेमाचा आदर ठेवून वेळेत ती पोहोचती करायचा. हल्लीच्या धकाधकीच्या काळात लहानपणी चिंचा, बोरांवरून ते अगदी आईच्या बाजूला कोण झोपणार यावरून भांडणारे ताई-दादा आता परस्परांना ई-पत्र, फोन किंवा चॅटद्वारे भेटण्याचा व राखी पौर्णिमा एकत्र साजरा करण्याचा आनंद उपभोगतात.

द्रौपदीने आपल्या मानलेल्या भावाला (कृष्णाला) बांधलेली जरतारी शेल्याची चिंधी, गरीब बहिणीने भावाच्या हातात बांधलेला धागा किंवा शाळकरी ताईने तयार केलेली राखी, राजपूत रमणीने बाजूच्या राजाला पाठवलेले राखीचे ताट, श्रीमंत बहिणीने भावाला बांधलेली सोन्याची किंवा चांदीची राखी काय किंवा आज इंटरनेटच्या माध्यमातून बहिणीने भावाला पाठवलेली ई-शुभेच्छापत्रसहित राखी काय या सर्वांमागे भावना एकच आहे ती म्हणजे भावाबहिणींचे परस्परांवरील प्रेम! आपल्या बरोबरंच आपल्या देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिक बांधवांना भगिनी प्रेमाने राख्या बांधतात. आपल्या पाठीशी राहुन रक्षण करणाऱ्या देवानासुद्धा महिला राख्या बांधतात. राजस्थान,गुजरात,मध्य प्रदेश या सारख्या राज्यांमध्ये बहिणींना भावाकडे जाण्यासाठी सोय म्हणून या दिवशी सर्व महिलांना बससेवा मोफत असते.

आता जाहिरातीचा जमाना असल्यामुळे या सणाच्या निमित्ताने 'कुछ मिठा होजाये' सारख्या असंख्य सुंदर जाहिराती ठिकठिकाणी झळकत असतात. बँक, सरकारी ऑफिसेस यानिमित्ताने कित्येक सुंदर योजना राबवतात. कित्येक ज्वेलर्स सोन्याचांदीच्या आकर्षक राख्या बनवून त्यांच्या जाहिराती करतात. कित्येक इव्हेन्टस् साजरे होतात.

आता स्त्रीया खूप सक्षम ,जागरूक झाल्या आहेत. स्वतःचे रक्षण,काळजी घेण्यास समर्थ झाल्या आहेत. असे असले तरी अजूनही हुंडाबळी, महिलांवर होणारे अत्याचार, त्यांचे शोषण या गंभीर समस्या नष्ट झालेल्या नाहीत. बरेचदा केवळ दिखाव्यासाठी 'रक्षाबंधन - इव्हेन्टस' या एका दिवसापुरते साजरे केले जातात. हे तेवढ्यापुरते न करता मनापासून जबाबदारीने मानलेल्या भगिनींचे रक्षण केले जाईल, त्यांच्या समस्या सुटतील तेंव्हाच हा सण साजरा करण्याचा हेतू सफल झाला असे म्हणता येईल.

**– सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.**

## रक्षाबंधन

रक्षाबंधनआनंदोत्सव
सोहळा असे विहंगम्
डोळ्यांचे फिटे पारणे
वात्सल्यधर्माचासंगम

ईडा पिडा टळो सारी
दुःखदारिद्र्याचेनिगम
भावाचा हो भाग्योदय
भगिनीचे होता आगम

वाट चाले ताई संगती
भले रस्ता असो दुर्गम
आशीर्वादडोक्यावरती
उद्दिष्टयात्रा होय सुगम

भेट वस्तु देई इप्सित
सावरे तिला हा संभ्रम
तीचं देई भरभरू अरे
भावास अहकारी भ्रम

नारीवर नीतअत्याचार
मोकाट हिंडती अधम
बहिणीचा रक्षण कर्ता
का भाऊ मातवे उधम

प्राचिन परंपरा उत्तम
आरंभ जरी अनागम
ग्रंथ संपदा वाचे जरी
नाते ना कळे अनुगम

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## कधीतरी बेशिस्त असलेलं बरं

नियमांच्या या जगाला, रोज मानायचं कशाला?
कधीतरी स्वतःसाठी, थोडं चुकलेलं बरं असतं...

सारखं हसत राहायचं, वेदना लपवून उराशी,
कधीतरी डोळ्यांमधून, दुःख वाहिलेलं बरं असतं...

जिंकण्याच्या नादामध्ये, हरवतो आपणच कितीदा,
कधीतरी स्वतःकडूनही, थोडं हरलेलं बरं असतं...

सगळ्यांच्या मर्जीवरती, आयुष्य जगायचं कशाला?
कधीतरी जगाच्या विरुद्ध, उभं राहिलेलं बरं असतं...

ठरलेल्या वाटांवरती, पाय का नेहमी पडावेत?
कधीतरी एखाद्या वळणावर, भरकटलेलं बरं असतं...

नात्यांच्या या गर्दीमध्ये, स्वतःसाठी जागा कुठे?
कधीतरी एकटेपणाशी, घट्ट मिळलेलं बरं असतं...

शहाणपणाच्या सावलीतही, ऊन मनाला लागतंच,
कधीतरी वेड्या पावसात, चिंब भिजलेलं बरं असतं...

आयुष्याला रोज मोजणं, श्वासाश्वासाचा हिशोब कशाला?
कधीतरी क्षण हातातून, निसटलेला बरं असतं...

शिस्तीत सगळं जगताना, मन कुठेतरी मरतं म्हणे,
म्हणूनच कधीतरी थोडं.. बेशिस्त झालेलं बरं असतं...

**– कीर्तिराज आगलावे, पुणे**

## कर्करोगावरील उपचारांत ऐतिहासिक क्रांती...



जगभरातील कॅन्सर अर्थात कर्करोगावरील उपचारांच्या क्षेत्रात आता एका नव्या आणि ऐतिहासिक क्रांतीची पहाट झाली आहे. मॉडर्ना आणि मर्क या जगातील दोन मोठ्या आणि नामांकित औषध उत्पादक कंपन्यांनी एकत्रितपणे तयार केलेली एमआरएनए तंत्रज्ञानावर आधारित खास कर्करोग प्रतिबंधक लस तिसऱ्या टप्प्यातील वैद्यकीय चाचणीत अत्यंत यशस्वी ठरल्याचे वृत्त आहे. त्वचेच्या अत्यंत गंभीर कर्करोगावर म्हणजेच मेलानोमावर सध्या उपलब्ध असलेल्या पारंपरिक उपचारापेक्षा ही नवीन लस कितीतरी पटीने अधिक प्रभावी आणि परिणामकारक असल्याचे या चाचणीतून सिद्ध झाले आहे.

या नवीन आणि प्रगत संयुक्त उपचार पद्धतीमुळे रुग्णांचा कर्करोग पुन्हा उद्भवण्यापासून रोखण्यात तसेच कर्करोगाचा शरीरात इतरत्र प्रसार होण्याचा मोठा धोका कमी करण्यात संशोधकांना यश आले आहे. त्यामुळे आता सर्व रुग्णांना एकच पारंपारिक लस देण्याऐवजी अत्यंत अचूक आणि वैयक्तिक उपचार देणे शक्य होणार आहे. गेल्या १० वर्षाच्या अथक वैज्ञानिक प्रयत्नांना यश मिळाल्याचे समोर आले आहे. शस्त्रक्रियेद्वारे त्वचेचा कर्करोग काढून टाकलेल्या रुग्णांनाआजार पुन्हा होण्याची भीती असते.

मात्र आता या नव्या उपचारामुळे अत्यंत भक्कम आणि सुरक्षित संरक्षण कवच मिळणार आहे. त्यामुळे ही नवीन उपचार पद्धती यशस्वी ठरल्यास भविष्यात फुफ्फुस, मूत्राशय, मूत्रपिंडाच्या कर्करोगावरील उपचारांमध्ये अमुलाग्र बदल घडतील कर्करोगाच्या गाठी नष्ट करण्यासाठी एमआरएनए तंत्रज्ञानाचा अत्यंत प्रभावी शस्त्र म्हणून वापर करता येवू शकतो हे या चाचणीने सिद्ध केले आहे.

**– राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# ढोकेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांकडून व्यसनमुक्तीचा नारा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, पारनेर (अहिल्यानगर) :** समाजातील वाढते व्यसनाधीनतेचे प्रमाण लक्षात घेतले तर समाजातील सर्व घटकांनी व्यसनमुक्तीसाठी सामूहिक प्रयत्न करावेत आणि विद्यार्थ्यांनी पालकांसमोर मोबाईल घेऊन देण्यासाठी हट्ट करण्याऐवजी घरातील सदस्यांना जडलेले व्यसन सोडवण्यासाठी हट्ट करावा, असे आवाहन प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय टाकळी ढोकेश्वरच्या उज्वला दीदी यांनी केले. पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पाचवी ते बारावीच्या चौदाशे शाळकरी विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीची प्रतिज्ञा घेतली व व्यसनापासून दूर राहण्याचा संकल्प केला त्या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उज्वला दीदी बोलत होत्या. ग्रामविकासाबरोबरच सामाजिक व आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी ढोकेश्वर विद्यालयात पाचवी ते बारावीच्या १४०० विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीचा नारा दिला.

याप्रसंगी पायमोडे दीदी, प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब निबडुंगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रमोद भाई, रमण भाई, दिपक भाई, सुधा माताजी, बाबासाहेब जाधव, रवींद्र मते, श्रीरंग धामणे, संदीप महाबुले, नारायण शेळके, निलम खिलारी, वैशाली गायकवड, कल्पना जाधव, सुमन वाळुंज, प्रिया डकणे, सुरेखा ठाणगे, सोनल रोहकले, संदीप खिलारी, मिनाक्षी पवार, विष्णु भद्रे, सोनाली माळवदे, प्रा. अशोक गांगड, योगेश मांडगे, आतिष झावरे, देविदास आहिरे, राजेंद्र ढोणे, सचिन महानवर, पोपट जगदाळे, भाऊसाहेब हिंगडे, सुनील झावरे, मिनाक्षी खाडे, प्रा. दल्वी, नितीन ढोकले, मंगेश पोंपळवट, रामदास नरवडे, सीमा खोसे, सोनल पायमोडे, अनिकेत बांगर, सुवर्णा दिवे, शिरनाथ राऊत, पवन कुटे, अनुष्का कांबळे, भाऊसाहेब बोंबे, अमोल गोरे, नारायण हरेल, सुनीता घोडके उपस्थित होते. सूत्रसंचालन अतुल सैद यांनी केले. पर्यवेक्षक बाळासाहेब निबडुंगे यांनी आभार मानले.

# ढोकेश्वर महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख कोठावळे यांचा सेवापूर्ती निमित्त गौरव

## प्रा.लक्ष्मण कोठावळे यांचे शैक्षणिक योगदान उल्लेखनीय - रामचंद्र दरे



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, पारनेर (अहिल्यानगर) :** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर महाविद्यालयाचे प्रा.लक्ष्मण भिकाजी कोठावळे यांचे शैक्षणिक,सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान उल्लेखनीय असल्याचे प्रतिपादन जिल्हा मराठा संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांनी केले. श्री ढोकेश्वर महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा.लक्ष्मण भिकाजी कोठावळे यांच्या सेवापूर्ती निमित्त प्रा.लक्ष्मण कोठावळे व संगीता कोठावळे यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. प्रा.लक्ष्मण कोठावळे यांनी सेवापूर्तीच्या निमित्ताने जिल्हा मराठा संस्था, ढोकेश्वर महाविद्यालय,विद्यार्थी पालक यांचे सहकार्याबद्दल आभार मानले. कार्यक्रमास सीताराम खिलारी, डॉ.विकासानंद महाराज मिसाळ तसेच निकिता कोठावळे, धनश्री झावरे, अनिता रोकडे, डॉ.हरीश शेळके, शरद कोठावळे, विलास महाराज लोंढे, गंगाधर बांडे, डॉ.वीरेंद्र धनशेट्टी मा.प्राचार्य डॉ.दत्तात्रय खोडदे, प्राचार्य डॉ.बाळासाहेब सागडे व डॉ.भाऊसाहेब खिलारी आदी उपस्थित होते. डॉ.वासुदेव साळुंके यांनी आभार मानले ह.भ.प. सुपेकर महाराज यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, आजी व माजी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# न्यू इंग्लिश हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय चंद्रपूर येथे

## स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण संपन्न



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चंद्रपूर :** दि एज्युकेशन सोसायटी चंद्रपूर द्वारा संचालित स्थानिक न्यू इंग्लिश हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय, चंद्रपूर येथे स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, सर्जनशीलतेला आणि देशभक्तीच्या भावनेला प्रोत्साहन देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने विद्यालयात देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धा, पाककला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, तिरंगा राखी बनविणे स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा तसेच इतर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या सर्व स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत आपले विविध कलागुण सादर केले.

या स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विजेत्या विद्यार्थ्यांना तसेच सहभागी विद्यार्थ्यांना प्राचार्या बैद मॅडम, पर्यवेक्षिका नरड मॅडम तसेच शिक्षक-शिक्षिकांच्या हस्ते पारितोषिके आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. यावेळी प्राचार्या बैद मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना सांगितले की, अशा विविध स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो, आत्मविश्वास वाढतो आणि विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, सर्जनशीलता व नेतृत्वगुण विकसित होण्यास मदत होते.

स्पर्धेत मिळालेले यश महत्त्वाचे असले तरी उत्स्फूर्तपणे सहभाग घेणे आणि नव्या गोष्टी शिकणे हीदेखील तितकीच महत्त्वाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

विविध स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर प्रमाणपत्र व बक्षीस मिळाल्याचा आनंद दिसून येत होता. शिक्षक-शिक्षिकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भविष्यातही विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी होण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पर्यवेक्षिका नरड मॅडम तसेच सर्व शिक्षक-शिक्षिकांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आणि प्राचार्या बैद मॅडम यांच्या मार्गदर्शनामुळे हा बक्षीस वितरण समारंभ संस्मरणीय ठरला.

# पारनेर तहसीलची लाजिरवाणी दशा! रेशनसाठी अंध वृद्ध महिला चिमुकल्यासह जमिनीवर

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२७, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाच्या कारभाराचा भोंगळपणा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. रेशन धान्य मिळत नसल्याने एक अंध वृद्ध महिला आपल्या लहान बाळाला घेऊन थेट पुरवठा शाखेच्या दारातच जमिनीवर बसून असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

सोशल मीडियाच्या माध्यमातून लक्षात आल्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेना पारनेर तालुका अध्यक्ष अविनाश पवार आक्रमक होऊन पुरोठा अधिकारी यांना फोन द्वारे धारेवर धरत जाब विचारून घटनेची गंभीर दखल घेत पुरोठा विभागाच्या कामाबद्दल नाराजी व्यक्त केली. गरीब गरजू जनतेला न्याय देणाऱ्या तहसील कार्यालयातच जर अंध वृद्ध महिलेला अशा प्रकारे वाऱ्यावर सोडले जात असेल तर प्रशासन करते तरी काय? असा संतप्त सवाल उपस्थित केला...?



फोटोमध्ये स्पष्ट दिसत आहे की, वृद्ध आजी भिंतीला टेकून हतबलपणे बसली असून तिच्या मांडीवर एक लहान बाळ झोपले आहे. बाजूला लाल पिशवी आणि शासकीय टेबल आहे.

कार्यालयात कर्मचारी असूनही तिची कोणीही दखल घेतली नाही. शासन गरीबांना मोफत रेशन देत असल्याचा गाजावाजा करत असताना प्रत्यक्षात तळागाळातील लाभार्थ्यांना धान्यासाठी अक्षरशः भीक मागावी लागत आहे.

या अमानवीय प्रकाराला जबाबदार कोण?

पुरवठा अधिकारी की मुजोर यंत्रणा?

या प्रकरणाची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने गंभीर दखल घेऊन संबंधित महिलेला पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरत तात्काळ धान्य मिळवून दिले असल्याचे पवार यांनी सांगितले. तसेच या बाबत मनसे तालुका अध्यक्ष अविनाश पवार म्हणाले की घटना अतिशय दुर्दैवी आहे त्यामुळे संबंधित मावशी बाबत पुरवठा विभागाला जाब विचारून महिलेला न्याय मिळवून दिला असला तरी याला सर्वस्वी जबाबदार असणाऱ्या त्या गावातील स्वस्त धान्य दुकानदार यांचा संपूर्ण सात बारा लवकर महाराष्ट्र नवनिर्माण सेना काढेल.

# रायगडमध्ये "FFS' डिजिटल खत विक्री प्रणालीचा सुरवात

## पेणमध्ये जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष पाहणी; सर्व तालुक्यांत यंत्रणा सक्रिय



**शेतकऱ्यांना काय फायदा?**
खत वितरणात पारदर्शकता वाढणार
QR कोडद्वारे डिजिटल पद्धतीने वितरण
खत विक्रीची नोंद अधिक व्यवस्थित राहणार
अनधिकृत विक्री व गैरवापरावर नियंत्रणास मदत
बुकिंग व वितरण प्रक्रिया अधिक सुलभ होण्याची अपेक्षा
तांत्रिक अडचणींसाठी कृषी विभागाकडून मार्गदर्शन

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.२७, पेण (रायगड) :** अनुदानित रासायनिक खतांचे वितरण अधिक पारदर्शक, सुलभ आणि शेतकरीकेंद्री करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेली 'फ्रेम वर्क फॉर फर्टिलायझर सेल्स' (ऋॠड) ही डिजिटल खत विक्री प्रणाली रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रणालीची प्रत्यक्ष अंमलबजावणी तपासण्यासाठी तसेच शेतकरी व खत विक्रेत्यांना येणाऱ्या अडचणी जाणून घेण्यासाठी जिल्हा कृषी विभागाकडून विशेष पाहणी मोहीम राबविण्यात येत आहे.

या मोहिमेअंतर्गत रायगडच्या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती वंदना शिंदे यांनी पोयनाड आणि पेण येथील खत विक्री केंद्रांना प्रत्यक्ष भेट देऊन FFS प्रणालीच्या कामकाजाची पाहणी केली. यावेळी बुकिंगपासून ठ्ठ कोड निर्मिती आणि त्यानंतरच्या खत वितरण प्रक्रियेचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला.

**पोयनाडमध्ये ठ्ठ कोडद्वारे युरिया वितरण**

पोयनाड येथील भूषण कृषी सेवा केंद्रात ऋॠड प्रणालीअंतर्गत ठ्ठ कोड तयार करून शेतकऱ्यांना युरिया खताच्या बॅगांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाचा शुभारंभ जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांच्या हस्ते झाला. यावेळी रायगड जिल्हा परिषदेचे मोहीम अधिकारी महेश नारायणकर आणि जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक बुद्धभूषण मुनेश्वर उपस्थित होते.

डिजिटल पद्धतीने खत विक्री व वितरणाची नोंद होत असल्याने अनुदानित खतांच्या वितरणात पारदर्शकता वाढण्यास मदत होणार आहे. तसेच खतांचा गैरवापर, अनधिकृत विक्री आणि काळाबाजार रोखण्यासाठी ही प्रणाली उपयुक्त ठरण्याची अपेक्षा आहे.

**पेणमध्ये प्रणालीची प्रत्यक्ष पाहणी**

ऋॠड प्रणालीद्वारे खताचे बुकिंग कसे केले जाते, ठ्ठ कोड कसा तयार केला जातो आणि त्यानुसार खताची विक्री व वितरण कशा पद्धतीने होते, याची माहिती घेण्यासाठी वंदना शिंदे यांनी पेण येथील कोकण कृषी सेवा केंद्राला भेट दिली.यावेळी त्यांनी खत विक्रेत्यांकडून प्रणालीच्या वापराबाबत माहिती घेतली. तसेच शेतकरी व विक्रेत्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी जाणून घेऊन आवश्यक मार्गदर्शन केले. प्रणालीचा वापर करताना कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी संबंधितांना सूचना देण्यात आल्या.

**सर्व तालुक्यांत गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांची नजर**

रायगड जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्येही ऋॠड प्रणाली सुरळीतपणे कार्यान्वित राहावी यासाठी संबंधित गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक (QCI) यांच्यामार्फत देखरेख ठेवण्यात येत आहे. खत विक्रेत्यांना प्रणालीचा वापर करताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी तसेच शेतकऱ्यांच्या अडचणींचा आढावा घेऊन त्यावर आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात आहेत.

**अडथळा मुक्त खत वितरणासाठी कडक सूचना**

शेतकऱ्यांना खत खरेदीसाठी अनावश्यक वेळ रांगेत घालवावा लागू नये आणि बुकिंग व वितरणाची प्रक्रिया अधिक नियोजनबद्ध पद्धतीने व्हावी, हा FFS प्रणालीमागील प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे प्रणालीअंतर्गत खताचे बुकिंग, ठ्ठ कोड निर्मिती आणि वितरण प्रक्रिया सुरळीत पार पडावी, यासाठी जिल्ह्यातील संबंधित कृषी अधिकारी, कर्मचारी आणि खत विक्रेत्यांना जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी आवश्यक सूचना दिल्या आहेत.

खत बुकिंग, खताची उपलब्धता, QR कोड किंवा वितरण प्रक्रियेत अडचण आल्यास संबंधित तालुका कृषी अधिकारी, गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, पंचायत समिती कृषी अधिकारी अथवा कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या १०६व्या सार्वजनिक जयंती निमित्त उदगीर ग्रामीण भागात विविध कार्यक्रम संपन्न

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२७, उदगीर (लातुर) :** साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या १२६ सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या वतीने उदगीर ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात अण्णाभाऊ साठे यांचे विचार पसरवण्यासाठी विविध कार्यक्रमाची आखणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उदगीर जळकोट विधानसभा प्रमुख स्वप्निल अण्णा जाधव यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली होती.समाज सुधारक, लोककवी आणि साहित्यिक म्हणून जगाला परिचित असले लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नाव अजरामर आहे. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य उपेक्षित, दलित व कामगार वर्गाच्या हक्कासाठी आणि समाज परिवर्तनासाठी वाहून घेतले. महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांनी समाजाची जडणघडण करण्यासाठी केलेले कार्य हे सोनेरी अक्षराने लिहिण्यासारखे आहे. त्यांनी आपल्या साहित्यातून जाती व्यवस्था, अस्पृश्यता आणि अंधश्रद्धा यांच्याविरुद्ध तीव्र संघर्ष केला. हा संघर्ष अधिक तीव्र करण्यासाठी लोकाभिमुख होत त्यांनी लालबावटा कलापथक आणि सांस्कृतिक चळवळीची स्थापना केली. अण्णाभाऊंनी लाल बावटा कलापथकांची कीर्ती गाजवली. लोकप्रबोधन करण्यासाठी तमाशा, पोवाडे आणि लावणी या लोककलांचा वापर करत त्यांनी समाज प्रबोधनाचे हत्यार म्हणून मनोरंजनातून लोकांना विषयाचे गांभीर्य पटवून दिले. कामगार आणि ग्रामीण जनतेत अन्यायाविरुद्ध लढा देण्याची चेतना निर्माण करण्यासाठी साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. संयुक्त महाराष्ट्राचा लढा आणि गोवा मुक्ती संग्रामात अण्णाभाऊंनी गाजवलेले कार्य लोकाभिमुख आहे.

मुंबई गुजरातला जोडण्याच्या प्रयत्नाच्या वेळी मुंबई कोणाची, आमची! यासारख्या शाहिरी रचनांनी आणि लावण्यांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीत आणि मुंबईच्या गिरणी कामगारांमध्ये अभूतपूर्व ऊर्जा निर्माण करण्यासाठी अण्णाभाऊ साठे यांनी मोलाचे योगदान दिले. दारिद्र्यामुळे त्यांना शिक्षण घेता नाही आले तरी उच्च शिक्षण घेतलेल्या माणसाला देखील लाजवेल, इतक्या ताकतीचे लिखाण त्यांनी केले आहे. ३५ कादंबऱ्या, पंधरा कथासंग्रह आणि अनेक नाटके त्यांनी लिहिले आहेत. त्यांची फकीरा ही कादंबरी मराठी साहित्यात मानाचे स्थान मिळवून अजरामर झाली आहे. अण्णाभाऊ साठे यांनी शोषितांचे खरेखुरे जग आपल्या साहित्यातून मांडल्यामुळे त्यांना दलित साहित्याचे प्रणेते मानले जाते. अशा शब्दात स्वप्निल अण्णा जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त करून अण्णाभाऊंच्या कार्याची




ओळख समाजाला होण्यासाठी आणि समाज हिताची जाण तरुणांमध्ये निर्माण करण्यासाठी ग्रामीण भागातून अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या प्रमाणात साजरी करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.यावर्षी प्रतिनिधिक स्वरूपामध्ये वाढवणा येथे मोठ्या प्रमाणात ही जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने वाढवणा महोत्सव घेऊन परिसरातील शेकडो विद्यार्थ्यांना कलेमध्ये रुची निर्माण केली. तसेच ज्यांच्या अंगी कलागुण आहेत, त्यांच्या कलागुणांना आकार देण्यासाठी मोठ्या प्रमाणात बक्षीस ठेवून युवा वर्गाला आणि विद्यार्थ्यांना या स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी व्यासपीठ मिळवून दिले. अत्यंत दर्जेदार अशा पद्धतीचा हा कार्यक्रम स्वप्निल अण्णा जाधव यांच्या नेतृत्वात घेण्यात आला.या कार्यक्रमासाठी शिवसेनेचे तालुकाप्रमुख महेश फुले तसेच सामाजिक जाण असलेले राजू किनीकर, पांडुरंग परेड, सारंग आगलावे, मंगेश येरकुंडे, दत्ताभाऊ बामणे, सोनू माळी उपसरपंच प्रमोद बिरादार, संगम आष्टुरे, गंगाधर भांगे, महादेव कांबळे, नागेश ठोंबरे, बबन भांगे, शैलेश जाधव, महावीर भांगे, प्रीतम जाधव, कृष्णा जाधव, बाळासाहेब जाधव, सुरज जाधव, उद्धव अंधारे, कृष्णा मारुती जाधव, अशोक अंधारे, अंगद जाधव, मिलिंद जाधव, गणपत जाधव, शिवाजी जोंधळे इत्यादी मान्यवर या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित होते.वाढवणा महोत्सवातील सामूहिक आणि वैयक्तिक नृत्य स्पर्धेसाठी मोठमोठी पारितोषिके ठेवल्यामुळे शेकडो विद्यार्थी आणि तरुणांनी या नृत्य स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन आपले कलागुण दाखवले. कला जोपासण्याचा सल्लाही याप्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना दिला. भविष्यात अशा पद्धतीचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात गावोगावी घेण्याची गरज असल्याचे स्वप्निल अण्णा जाधव यांनी स्पष्ट केले. समाजातील तरुणांनी एकत्र येऊन भावी पिढीचा विचार करून सामाजिक कार्यामध्ये वेळ द्यावा. असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले.

# बळीराजाच्या नजरा आकाशाकडे; अहिल्यानगर जिल्ह्याला दमदार पावसाची अद्याप ही प्रतिक्षाच...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, अहिल्यानगर :** पावसाळ्याची सुरुवात होऊन आता जवळपास तीन महिने उलटूनही अहिल्यानगर जिल्ह्यात अद्याप मोठा पाऊस झालेला नाही. नाही म्हणायला सुरुवातीला झालेल्या किरकोळ पावसाने काही शेतकऱ्यांनी खरीपाच्या पेरण्या उरकल्या, मग आता पावसाअभावी संकट आ वासून उभे राहिले आहे.

त्यामुळे बळीराजाच्या नजरा आजही आकाशाकडे लागल्या असून दमदार पावसाची सर्वांना प्रतिक्षा आहे. मागच्या काही वर्षात सूर्य आग ओकत आहे. त्यामुळे उन्हाळ्यात जीवाची अक्षरशः काहिली झाली. तेव्हा नागरिकांना कधी एकदा असह्य उन्हाळा संपून पावसाळा सुरु होतो, असे झाले होते. एकदा का उन्हाळा संपला आणि सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला. पावसाळा सुरु झाल्याबरोबर काही दिवस उलटून गेल्यानंतर का होईना पण दमदार पाऊस होईल, या आशेवर शेतकऱ्यांसह सामान्य नागरिकही होते.

पाऊस आज पडेल, उद्या पडेल या आशेवर असलेल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांसह प्रत्येकाला वरुण राजाने गुंगारा दिला. नाही म्हणायला जिल्ह्याच्या काही भागात पाऊस झाला, परंतु तो जिल्हाभरात सर्वदूर झाला नाही. ज्या भागात पाऊस झाला, त्या भागातील पिके तग धरून आहेत. परंतु हीच स्थिती जिल्ह्यात सर्वांकडे दिसून येत नाही. एकंदर परिस्थितीवरून अर्जीमतीस खरीप हंगाम धोक्यात आला आहे, असे म्हटल्यास नवल वाटू नये. गेल्या पंधरा दिवसात आकाशात ढग मोठ्या प्रमाणात जमले पाहायला मिळतात. अनेकदा वातावरण असे निर्माण होते की, थोड्याच वेळात जोरदार पाऊस सुरु होईल. परंतु थोडासा सडा टाकल्याप्रमाणे पावसाचे चार थेंब पडतात आणि ढग निघून जातात. ढगाळ वातावरणामुळे वातावरणातील धगही बऱ्याच प्रमाणात वाढली आहे. हवामान विभाग आणि पंचांगातही येणाऱ्या काही दिवसात समाधान कारक पाऊस होणार असल्याचे दर्शविण्यात आले आहे.

त्यामुळे येत्या काही दिवसात वरुणराजाची कृपादृष्टी होण्याचे संकेत वर्तवले जात आहेत. हवामान विभागापेक्षा अनेक लोक आजही पंचांगावर अधिक विश्वास ठेवून चालतात, असेही निदर्शनास आले आहे. काही का असेना, एकंदर परिस्थितीवरून बळीराजासह सामान्य नागरिकांचा ही नजरा आकाशाकडे लागल्याचे दिसून येत आहे.

मोठ्या पावसाअभावी जिल्ह्यातील धरणातील पाणी पातळीही दिवसेंदिवस खालावत चालली आहे. आणखी काही दिवस वरुण राजाची कृपादृष्टी नाही झाल्यास पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# पालकमंत्री बोर्डीकर यांच्या उपस्थितीत आज कोक येथे भव्य मंगल कलश रोहन स्थापना

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२७, जिंतूर (परभणी) :** जिंतूर तालुक्यातील कोक येथे श्री मंगल कलश रोहन स्थापना महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, या भव्य धार्मिक सोहळ्यास परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. माजी जिल्हा परिषद सदस्य रामेश्वर जावळे यांच्या पुढाकारातून तसेच समस्त भजनी मंडळ, कोक यांच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवार, दि.२८ ऑगस्ट २०२६ रोजी दिवसभर विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळणार आहे. या निमित्ताने गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, परिसरातील भाविकांमध्ये ही मोठा उत्साह आहे.

**नगरप्रदक्षिणा व दिंडी सोहळ्याने होणार सुरुवात**

महोत्सवाची सुरुवात सकाळी ६ ते १० वाजेपर्यंत नगरप्रदक्षिणा व दिंडी सोहळ्याने होणार आहे. मंगल कलशाची नगरप्रदक्षिणा व दिंडी सोहळा पार पडणार असून, यावेळी मार्गावर आकर्षक भजनी व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर निश्चित वेळेत मंगल कलशाची स्थापना करण्यात येणार आहे.

**दुपारी रंगणार भव्य कीर्तन सेवा**

दुपारी १२ ते २ वाजेपर्यंत कळसाचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. यावेळी ह.भ.प. श्री स्वरसम्राट प्रविणजी महाराज सोनाळे गुरूजी यांची कीर्तन सेवा होणार आहे.कीर्तन सेवेला विविध मान्यवर कीर्तनकार व संगीत विशारदांची साथ लाभणार आहे. त्यामुळे या कार्यक्रमाला धार्मिक तसेच सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

**पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या उपस्थितीमुळे सोहळ्याला विशेष महत्त्व**




या मंगल कलश रोहन स्थापना महोत्सवाला पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. परिसरातील नागरिक, भाविक आणि भक्तगण मोठ्या संख्येने या सोहळ्यात सहभागी होण्याची अपेक्षा आहे.या संपूर्ण धार्मिक सोहळ्यास धर्मभूषण ह.भ.प. सुदर्शन महाराज राजस्त दुगांवकर यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभत आहे.

**कोक गावात भक्तिमय वातावरण**

मंगल कलश रोहन स्थापना महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोक गावात तयारीला वेग आला असून, मंदिर परिसर व कार्यक्रमस्थळी धार्मिक वातावरण निर्माण झाले आहे. विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी भाविकांमध्ये उत्सुकता आहे. आपणा सर्व सहकुटुंब सहपरिवार उपस्थित राहून या मंगलमय सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन समस्त भजनी मंडळ, कोक यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# पनवेल ग्रामपंचायत हद्दीत घर घेताय?

## सावधान! अनधिकृत बांधकामांमुळे होऊ शकते लाखोंची फसवणूक

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.२७, पनवेल (नवी मुंबई) :** पनवेल तालुक्याचा झपाट्याने विकास होत असून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या विमानतळासह विविध पायाभूत सुविधा आणि प्रस्तावित व विकसित होत असलेल्या वाहतूक व्यवस्थेमुळे या परिसरातील घरांच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. या वाढत्या मागणीचा गैरफायदा घेत काही बांधकाम विकासकांकडून नियमांचे उल्लंघन करून बांधकामे करण्यात येत असल्याचा गंभीर आरोप होत आहे. त्यामुळे घर खरेदी करताना नागरिकांनी अत्यंत सावधगिरी बाळगून सर्व शासकीय कागदपत्रांची पडताळणी करण्याची गरज निर्माण झाली आहे.

सुखापूर, देवद, पाली देवद, ऊसर्ली, शिवकर, विचुंबे, आकुर्ली, आदई, उमरोली, नेरे, हरिग्राम आणि पळस्पे या ग्रामपंचायत हद्दीतील अनेक भागांत मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरू असून, काही विकासकांनी नियमांचे पालन करून प्रकल्प उभारले असले तरी अनेक प्रकल्पांबाबत आवश्यक शासकीय परवानग्या आणि प्रमाणपत्रांविषयी प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ग्राम पंचायत हद्दीत उभारण्यात आलेल्या काही इमारतींना इमारत पूर्णत्व प्रमाणपत्र (CC), भोगवटा प्रमाणपत्र (OC) तसेच आवश्यक इतर मंजुरी आणि प्रमाणपत्रे नसल्याची तक्रार आहे. शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून बांधकाम झाल्यास त्याचा सर्वाधिक फटका घर खरेदी करणाऱ्या सामान्य नागरिकांना बसण्याची शक्यता आहे.विशेष म्हणजे, काही ठिकाणी दोन मजल्यांची G+2 परवानगी असताना प्रत्यक्षात चार मजल्यांपर्यंत G+4 बांधकाम करण्यात आल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. अशा प्रकारच्या बांधकामांची सखोल चौकशी करून संबंधित विकासकांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

**लाखो रुपये खर्च करूनही मूलभूत सुविधांसाठी संघर्ष**

घर घेण्यासाठी आयुष्याची बचत आणि लाखो रुपये खर्च करणाऱ्या नागरिकांना अनेक ठिकाणी मूलभूत सुविधांसाठीही संघर्ष करावा लागत असल्याचे चित्र आहे. सार्वजनिक वाहतूक सुविधा अपुऱ्या असल्याच्या तक्रारी आहेत. अनेक भागांत पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना पैसे मोजावे लागतात, तर उन्हाळ्यात वापराच्या पाण्यासाठीही विकतच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.एकीकडे घर खरेदीसाठी लाखो रुपये खर्च करायचे आणि दुसरीकडे पाणी, रस्ते, वाहतूक यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी अतिरिक्त खर्च व त्रास सहन करायचा, अशी परिस्थिती अनेक नागरिकांसमोर निर्माण झाली आहे.

**प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह**

पनवेल तालुक्यात शासनाचे नियम धाब्यावर बसवून मनमानी पद्धतीने अनधिकृत बांधकामे सुरू असल्याचे आरोप होत असताना, संबंधित प्रशासनाकडून पुरेशी आणि ठोस कारवाई होत नसल्याबद्दल प्रश्न उपस्थित केले जात आहेत. सिडको, जिल्हा परिषद, तहसील कार्यालय, पंचायत समिती तसेच संबंधित प्रशासनाने अशा बांधकामांची तातडीने तपासणी करावी, अशी मागणी होत आहे.अनधिकृत बांधकामांना कोणाचे संरक्षण आहे का, असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला



जात आहे. प्रशासन हे जनकल्याणासाठी असून नागरिकांच्या हिताचे रक्षण करणे ही त्यांची जबाबदारी असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

दोषींवर MRTP कायद्यांतर्गत कारवाईची मागणी अनधिकृत बांधकामे करून नागरिकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या विकासकांची चौकशी करून दोषी आढळल्यास त्यांच्यावर MRTP कायद्यानुसार तसेच लागूअसलेल्याइतर कायद्यांनुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. केवळ बांधकामे थांबविण्यापुरती कारवाई न करता, नियमांचे उल्लंघन करून घरांची विक्री करणाऱ्यांवरही जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे.

**घर खरेदीपूर्वी नागरिकांनी काय तपासावे?**

घर खरेदी करण्यापूर्वी नागरिकांनी कोणत्याही जाहिरातींना किंवा आकर्षक आमिषांना बळी न पडता खालील बाबींची खात्री करून घ्यावी –

संबंधित प्रकल्प RERA मध्ये नोंदणीकृत आहे का?

जागेची मालकी आणि जमिनीचे कागदपत्रे अधिकृत आहेत का?

बांधकामासाठी आवश्यक शासकीय परवानग्या घेण्यात आल्या आहेत का?

मंजूर नकाशा आणि प्रत्यक्ष बांधकामात फरक आहे का?इमारतीला CC (Completion Certificate) मिळाले आहे का?

इमारतीला OC (Occupancy Certificate) मिळाले आहे का?पाणी, वीज, रस्ता आणि इतर मूलभूत सुविधांची कायदेशीर व कायमस्वरूपी व्यवस्था आहे का?

संबंधित प्रकल्पाबाबत कोणते न्यायालयीन प्रकरण किंवा शासकीय कारवाई प्रलंबित आहे का?

पनवेल तालुक्याचा वेगाने होणारा विकास आणि वाढती घरांची मागणी ही विकासकांसाठी मोठी व्यावसायिक संधी ठरत आहे. मात्र, याच संधीचा गैरफायदा घेऊन सामान्य नागरिकांना आकर्षक जाहिराती, स्वस्त दर आणि विविध सुविधांचे आमिष दाखवून फसवणूक होत असल्याच्या तक्रारींना प्रशासनाने गांभीर्याने घेण्याची गरज आहे.घर हे प्रत्येकाचे स्वप्न असते; मात्र हे स्वप्न आर्थिक फसवणुकीत बदलू नये, यासाठी प्रशासनाने अनधिकृत बांधकामांवर कठोर कारवाई करणे आणि नागरिकांनी घर खरेदीपूर्वी प्रत्येक कागदपत्राची सखोल पडताळणी करणे, ही काळाची गरज बनली आहे.

## थोडक्यात बातम्या

# विद्यार्थ्यांच्या नाजूक हातांनी साकारल्या राख्या; मेहनतीला मिळाली आपुलकीची दाद



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२७, नागपूर :** रक्षाबंधन म्हणजे केवळ भाऊ–बहिणीच्या प्रेमाचा सण नव्हे, तर नात्यांमधील जिव्हाळा, आपुलकी आणि भावनांचा उत्सव. याच भावनेला सर्जनशीलतेची जोड देत महाराष्ट्र विद्यालय खापरखेडा येथील विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेतून सुंदर राख्या तयार केल्या. त्यांच्या मेहनतीला व्यासपीठ मिळावे आणि 'आपल्या हाताने तयार केलेली वस्तू' विकण्याचा आनंद विद्यार्थ्यांना अनुभवता यावा, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या राखी प्रदर्शनाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांनी कागद, रंगीत मणी, धागे, सजावटीचे साहित्य आणि उपलब्ध वस्तूंचा कल्पक वापर करून एकापेक्षा एक आकर्षक राख्या तयार केल्या होत्या. प्रत्येक राखीमागे विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती, मेहनत आणि काहीतरी वेगळे करण्याची धडपड दिसून येत होती. प्रदर्शनात राख्या मांडल्यानंतर आपल्या हाताने तयार केलेल्या वस्तूंकडे पाहताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आणि उत्साह विशेष भावणारा ठरला. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राथमिक आरोग्य केंद्रातील भारती नागदिवे व तारा नायडू, महिला पोलीस अश्विनी नौकरकर व जयश्री गजभिये, माजी विद्यार्थिनी डॉ. निधी डिंबे (भूरकुंडे) तसेच पालक प्रतिनिधी कविता भोसकर यांच्या हस्ते झाले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलाकृतींची पाहणी करून त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थी केवळ राख्या तयार करून थांबले नाहीत, तर त्यांनी स्वतःच ग्राहकांशी संवाद साधत राख्यांची विक्री केली.

'ही राखी मी स्वतः तयार केली आहे', असे अभिमानाने सांगताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास दिसणारा उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होता. विक्रीच्या माध्यमातून त्यांना संवाद कौशल्य, व्यवहार ज्ञान, नियोजन, जबाबदारी आणि ग्राहकांशी सौजन्याने वागण्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. राखी खरेदी करण्यासाठी विद्यार्थी, महिला पालक आणि शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी प्रेमाने तयार केलेल्या राख्यांना पालकांनी आणि शिक्षकांनी पसंती देत खरेदी केल्याने विद्यार्थ्यांचा उत्साह आणखी वाढला. आपल्या कष्टाला मिळालेली ही दाद त्यांच्या दृष्टीने केवळ विक्री नव्हती, तर 'आपणही काहीतरी करू शकतो', हा आत्मविश्वास देणारा अनुभव होता. या उपक्रमासाठी मुख्याध्यापक अरुण वडस्कर, पर्यवेक्षक महूरतळे व पर्यवेक्षिका चानीकर यांनी मार्गदर्शन केले.

# साने गुरुजी शिक्षक पतसंस्थेची ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न



**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.२७, फुरसुंगी (पुणे) :** स्वर्गीय विठ्ठल तुपे साने गुरुजी शिक्षक पतसंस्थेची ३२वी वार्षिक सर्वसाधारण सभा हडपसर येथील साने गुरुजी भवन येथे पार पडली. या सर्वसाधारण सभेला साने गुरुजी संस्थेचे सचिव वसंत न्हावले, सहसचिव सुभाष आरोळे, ज्येष्ठ संचालक एस.बी.पाटील, सगाजी मोडका आदि प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी पतसंस्थेचे अध्यक्ष नानासाहेब झांबरे यांनी प्रास्ताविकात पतसंस्थेचे भाग भांडवल २ कोटी २८ लाख ४३ हजार असून यावर्षी निव्वळ नफा ३२ लाख ९४ हजार इतका झाला आहे तसेच सर्व सभासदांना ७.७५ टक्के दराने लाभांशा चे वाटप करण्यात आले असून १ कोटी पर्यंत ठेवी गेल्या आहेत अशी माहिती दिली.यावेळी पतसंस्थेचे माजी अध्यक्ष व मुख्याध्यापक रामचंद्र गाढवे यांनी पतसंस्थेच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले व काही सूचना सुचवल्या. कार्यक्रमाचे निमित्ताने विद्यालयाच्या सर्व शाखांच्या मुख्याध्यापकांचे सन्मान करण्यात आले.

याप्रसंगी पतसंस्थेचे सर्व संचालक व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या सत्काराचे निवेदन खजिनदार वैशाली मसीह यांनी केले तर निवृत्त कर्मचाऱ्यांच्या सत्काराचे निवेदन पतसंस्थेच्या सचिव सारिका काळभोर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंबादास शिरसाट यांनी केले तर आभार प्रदर्शन सखाराम गवारी यांनी केले. सभासद बैठकीमध्ये अहवालाचे वाचन करून हरकती व सूचना मागवण्यात आल्या.

# तुर्भे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाबाबत नवी मुंबई महापालिकेकडून वस्तुस्थिती स्पष्ट

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२७, नवी मुंबई :** महानगरपालिकेच्या तुर्भे येथील प्रस्तावित एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाबाबत काही माध्यमांतून चुकीची व दिशाभूल करणारी माहिती प्रसारित होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर महापालिका प्रशासनाने या प्रकल्पाची वस्तुस्थिती स्पष्ट केली आहे.प्रकल्पातील विषारी वायूमुळे आरोग्यास धोका असल्याच्या आरोपाबाबत महापालिकेने स्पष्ट केले की, घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निकषांनुसार असे प्रकल्प राबविणे स्थानिक स्वराज्य संस्थांना बंधनकारक आहे. हा प्रकल्प सध्याच्या पर्यावरणीय व आरोग्यविषयक समस्या सोडविण्यासाठीच आखण्यात आला असून त्याअंतर्गत दैनंदिन १,५०० मेट्रिक टन कचऱ्यावर वर्गीकरण प्रक्रिया, ६०० टन आरडीएफपासून २७ मेगावॅट वीजनिर्मिती, ४५० मेट्रिक टन कचऱ्यापासून नैसर्गिक वायुनिर्मिती तसेच बायोचार, लीचेट ट्रीटमेंट व जुन्या कचऱ्यावर बायोरेमेडिएशन प्रक्रिया राबविली जाणार आहे.निविदा प्रक्रिया व बँक गॅरंटीसंदर्भातील अनियमिततेच्या आरोपांबाबत महापालिकेने सांगितले की, हा प्रकल्प पीपीपी तत्त्वावरील डीबीएफओटी (इऋज्ञढ) स्वरूपाचा असून त्याची तपासणी आयआयटी, नीरी व मित्रा येथील तज्ज्ञ समितीमार्फत तसेच केंद्र व राज्य शासनाच्या पॅनेलवरील सल्लागारांमार्फत करण्यात आली आहे. निविदा अटींनुसार शासकीय व अनुसूचित बँकांकडून बँक गॅरंटी घेण्यात आली आहे.डीपीआर व राज्य शासन मंजुरीच्या अभावाबाबतचा आरोपही चुकीचा असल्याचे नमूद करत, महापालिकेने दि.०५/०३/२०२६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीचा दाखला दिला, ज्यानुसार त्यापूर्वी मंजूर प्रकल्प महापालिका स्तरावर राबविणे आवश्यक आहे.स्थानिक विरोध व जनसुनावणीच्या अभावाबाबत महापालिकेने स्पष्ट केले की, तुर्भे येथील जागा वर्षानुवर्षे घनकचरा व्यवस्थापनासाठीच वापरली जात असून तिला एमपीसीबीची अधिकृतता आहे. विकास आराखडा प्रसिद्धीच्या वेळीच या जागेसंदर्भात सार्वजनिक सुनावणी घेण्यात आली होती. लेटर ऑफ अॅवार्डनंतर देण्यात आलेल्या पूर्वतयारीच्या सूचनांना प्रत्यक्ष बांधकाम सुरू झाल्याचा गैरसमज करून घेऊ नये, असेही महापालिकेने नमूद केले.